छानननी व तालिनीकरण कक्ष
गणेशखिंड,पुणे ४११००७
दूरध्वनी क. २०२५६२१४३४
Website:www.unipune.ac.in.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

Scrutiny& Tabulation Section
Ganeshkhind,Pune-411007
Phone: 2025621398
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/छाननी व तालिनीकरण/ ०६ | दिनांक : ३१/१२/२०२२. 02/01/2023

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

विषय :– महाविद्यालयनिहाय केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प राबविणेबाबत ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२२, वास्तुशास्त्र (सर्व पॅटर्न) परीक्षा.

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार या सत्रांतील परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन सोबत जोडलेल्या यादीनुसार महाविद्यालयनिहाय केंद्रावर केंद्रीय मूल्यमापन पध्दतीने होणार आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ८९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे परीक्षेचा निकाल ३० दिवसांच्या मुदतीत जाहीर होणे आवश्यक आहे. परीक्षेचा निकाल विहीत मुदतीत जाहीर होण्यासाठी केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण होणे क्रमप्राप्त असल्याने ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२२ मध्ये होणा--या परीक्षांच्या उत्तरपत्रिका केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्रावर जमा करण्यासाठी आखलेल्या योजनेची अंमलबजावणी प्रत्येक परीक्षा केंद्रप्रमुखांनी करावयाची आहे. या संदर्भात खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

०१. दररोज ज्या ज्या विषयांची परीक्षा होईल त्या त्या विषयांच्या उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांच्या बैठक क्रमांकाप्रमाणे (ब्लॉकप्रमाणे) लावून घ्याव्यात. प्रत्येक ब्लॉकच्या कनिष्ठ पर्यवेक्षकांच्या अहवालामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावरील आसन क्रमांक व उत्तरपत्रिकेवरील आसन क्रमांक बरोबर असल्याची खात्री करुन बिनचूक व सुवाच्च अक्षरांमध्ये सदर अहवाल असावा. या अहवालाला विशेष महत्व आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारच्या संशयाला जागा राहू नये, याची काळजी घ्यावी. त्या सर्व उत्तरपत्रिकांचे गठ्ठे विभागवार बांधून ते सर्व गठ्ठे सीलबंद करुन ठेवावेत. कोणत्याही परिस्थितीत दोन वेगवेगळ्या विषयांच्या उत्तरपत्रिका एकाच गठ्ठयात बांधू नयेत.

०२. परीक्षा झाल्यानंतर लगेचच जर सदरचे गठ्ठे सीलबंद करण्यात आले नाहीत, तर काही गैरसमज होण्याची शक्यता असते. त्यासाठी विशेष काळजी घेणे जरुरीचे आहे. सीलबंद केलेल्या गठ्ठयांवर खालीलप्रमाणे माहिती नमूद करावी.

अ) परीक्षा केंद्राचे नाव
ब) परीक्षेचे नाव
क) विषयाचे नाव
ड) विभाग क्रमांक
इ) परीक्षा दिनांक व वेळ
फ) उत्तरपत्रिकांची संख्या

०३. उत्तरपत्रिकेच्या प्रत्येक सीलबंद गठ्यासोबत संबंधित परीक्षेच्या विषयाच्या प्रश्नप्रत्रिकांच्या दोन प्रतींचा तसेच कनिष्ठ पर्यवेक्षक अहवाल ....... फॉर्म १ व उपस्थिती अहवाल फॉर्म २ (Junior supervisor report and attendance report ) च्या प्रत्येकी एका प्रतीचा समावेश करणे आवश्यक आहे.

०४. प्रत्येक विषयांची परीक्षा झाल्यानंतर त्या विषयाचा अनुपस्थिती अहवाल, इमर्जन्सी बारकोड, कॉपी केस ची माहिती ऑनलाईन सिस्टीमचा वापर करुन नोंदविण्यात यावी. यासाठी www.unipune.ac.in या सकेंत स्थळावर Examination या लिंकवर College Login मधून Junior supervisor report → Add Absentee, Emergency Barcode and Copy

०५.ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२२ सत्रातील नियोजित व्यावसायिक अभ्यासक्रमाअंतर्गत येणा—या सर्व परीक्षेचे (पदवी व पदव्युत्तर) वर्षाच्या सीलबंद केलेल्या उत्तरपत्रिकांचे गठ्ठे आपल्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत विद्यापीठाने नमूद केलेल्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी प्रत्येक विषयाची परीक्षा संपल्यानंतर त्याच दिवशी महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत पोहचते करावेत व त्याची पोहोच पावती घ्यावी.

०६. अव्यावसायिक अभ्यासक्रमाअंतर्गत येणा—या अंतिम वर्ष परीक्षेचे (पदवी व पदव्युत्तर) वर्षाच्या सीलबंद केलेल्या उत्तरपत्रिकांचे गठ्ठे आपल्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत विद्यापीठाने नमूद केलेल्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी प्रत्येक विषयाची परीक्षा संपल्यानंतर त्याच दिवशी महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत पोहचते करावेत व त्याची पोहोचपावती घ्यावी.

०७. तसेच अव्यावसायिक अभ्यासक्रमाअंतर्गत अंतिम वर्ष वगळता प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष परीक्षेचे केंद्रीय मूल्यमापन (पदवी व पदव्युत्तर) हे संबधित महाविद्यालयांनी महाविद्यालय स्तरावर राबविण्यात यावे व नंतर संबधित विद्यार्थ्याचे गुण हे विद्यापीठाच्या ऑनलाईन वेब पोर्टलवर अंतर्गत गुणांप्रमाणे भरण्यात यावेत, त्यानंतर संबधित उत्तरपत्रिका हया महाविद्यालय स्तरावर जतन करुन ठेवाव्यात.

०८.परीक्षेच्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पांचे समन्वयक आणि सहाय्यक समन्वयक खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| समन्वयक | डॉ. प्रसाद कुलकर्णी, उपकुलसचिव<br>छानननी व तालिनीकरण कक्ष |
| सहायक समन्वयक | ०१. श्रीमती. सुनिता हजारे, सहायक कुलसचिव<br>०२. श्रीमती. अंजली खरे, कक्षाधिकारी |

सोबत विद्यापीठाने विहीत केलेल्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प राबविणा—या महाविद्यालयाची व संबधित अंतर्गत येणा—या महाविद्यालय/ परीक्षा केंद्राची यादी जोडली आहे. महाविद्यालयांनी त्यांचे नांव ज्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प राबविणा—या महाविद्यालयाच्या अंतर्गत नमूद केलेले आहे त्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प राबविणा—या महाविद्यालयाशी संपर्क साधून केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प व महाविद्यालय यांच्या परस्पर समन्वयाने काम करावयाचे आहे.

केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे काम सुरळीत होण्याच्या दृष्टीने विद्यापीठ प्रशासनाने केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे कामाची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्यासाठी सोबत मार्गदर्शक सूचना जोडून पाठवीत आहोत. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत होण्याच्या दृष्टीने उत्तरपत्रिकांचे गठ्ठे नियोजित ठिकाणी व नियोजित वेळेत येणे आवश्यक असल्यामुळे सर्व परीक्षा केंद्रांनी व विद्यापीठ उपकेंद्रांनी वरील योजनेची काटेकोर अमंलबजावणी करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला

(डॉ. प्रसाद कुलकर्णी)
उपकुलसचिव
छाननी व तालिनीकरण

सोबत :— वरीलप्रमाणे

प्रत माहिती व योग्य त्या कार्यावाहीसाठी अग्रेषित :—

०१. मा. प्राचार्य, संबधित केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प.
०२. मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
०३. उपकुलसचिव परीक्षा — (बारकोड विभाग).
०४. सहायक कुलसचिव (परीक्षा विभाग).
०५. कक्षाधिकारी, छाननी व तालिनीकरण, (अभियांत्रिकी कक्ष).